# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २७/०५/२०२१ (गुरुवार )


## कत्तलीसाठी जनावरांची वाहतुक करणाऱ्या कंटेनर पकडून ६६ जनावरांना जिवनदान, एकुण रुपये १६,६०,०००/— चा मुद्येमाल जप्त चौघांना अटक सावनेर पोलीसांची कार्यवाही

दिनांक २६.०५.२०२१ रोजी रात्री पोलीस स्टेशन सावनेर मौदा चे पथक मोहपा मोहपा फाटा सावनेर येथे नाकाबंदी करीत असता एक कथीया रंगाचा कंटेनर क्रमांक एपी १३ एक्स ७७०० येत असल्याचे दिसुन आले त्यास थांबवुन पथकांनी चेक केले असता कंटेनर चालकांनी एका कंपनीचे खोके वाहतुक करित असल्याचे सांगीतले वरुन संशय आल्याने कंटेनरची आतुन पाहणी केली असता कंटेनर मध्ये ६६ जनावरे कीमती ६,६०,०००रु. कल्त्तीकरीता त्याचे पाय, गळा, तोंड दोरीने बांधुन कंटेनर मध्ये खचाखच भरुन अत्युंत क्रुरपणे वाहतुक करतांना मिळून आले. सर्व जनावरांना तातडीने दोरी मध्युन मुक्त करुन कंटेनर मधुन बाहेर काढण्यात आले. जनावरे व कंटेनर एकुण रुपये चा १६,६०,०००रु चा माल जप्त करुन १) मनोज कुंजीलाल मिना वय ३० वर्ष रा. भोपाल जि. भोपाल राज्य मध्यप्रदेश, २) मोहम्मद जाकिर मोहम्मद जहीर वय ३७ वर्ष रा. भोपाल जि. भोपाल राज्य मध्यप्रदेश, ३) अजरूददीन जाहीर खान. वय २७ वर्ष भोपाल जि. भोपाल राज्य मध्यप्रदेश, ४) आबिद कमरअली खान वय १९ वर्ष रा बाबा झीया जि विदीशा जि. भोपाल मध्यप्रदेश चे विरुध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. २५९/२०२१ कलम ११, ११ (१)(जी),११(१)(ड) प्रा.क्रू.वा.प्र.का. व सहकलम ५(ए),५(बी) संरक्षण अधिनियम दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोउपनि मांढरे पो. स्टे. सावनेर मो.क्र. ८२७५२ ८४७४५ हे करित आहेत.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, उप विभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री. मुख्तार बागवान, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक मारोती मुळुक, सपोनि सतिश पाटी, पोउपनि वनोद मांढरे, पोहवा विजय पांडे, अशोक आठवले, बंडु कोकाटे, पोना दिनेश काकडे, पोशि अंकुश मुळे, दिनेश घाडगे, अंकुश शास्त्री, धोंडीबा नागरगोजे, दिनेश इंगाळे, चापोना अनिल देशमुख यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे)

## राहत्या घरात घुसुन चोरी करणाऱ्या चोरास अटक एकुण १४,०००/— चा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिपक जर्नादन ढोबळे वय ४२ रा हनुमान नगर कन्हान यांनी त्याचे घराचे बाथरूम मध्ये लावण्यात आलेले जगवार कंपनिचे ४ नळे उघडुन नेल्याने चार नळाची एकुण किंमत ११,००० रू व ३ कटर मशीन कि. ३००० रू असा एकुण १४,०००/— रु. रू चा माल २३/०५/२०२१ चे रात्री दरम्यान चोराने चोरुन नेल्याची तोडी रिपोर्ट अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखाचे कन्हान विभागातील पथकास सदर चोरी बाबत गोपनिय माहिती प्राप्त झाल्याने दिनांक २६/०५/२०२१ रोजी विशाल मिलीद नितनवरे वय ३० रा जवाहर नगर कन्हान यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्याचे सदर चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपीस पुढील कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा विनोद काळे, पोना शैलेष यादव, सत्यशिल कोठारे, पोशि प्रणय बनाफर चासफौ साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.

### —: चोरी ( रेती ) :—

**पो.स्टे. बेला** :— अंतर्गत १० किमी अंतरावरील मौजा बोरीमजरा येथे २५/०५/२०२१ चे १९/३० वा.चे दरम्यान पो.स्टे. बेला चे पथकास चालक आशीष प्रकाश वाघ वय २७ वर्ष रा.नागभीड कुनघाडा चौक मोहाली जि.चंद्रपुर चा त्यांचे ताब्यातील टिप्पर क्र. एम.एच ४०,एके ७३०२ मध्ये पवनी नदीतील पांढरी रेती (गौण खनीज) ५.५ ब्रॉस किंमत २६,५०० रू. चा माल चोरी करतांनी मिळुन आला. टिप्पर व रेती अशा एकुण रुपये ८,२६,५००/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा/६८६ अजय चौधरी पो.स्टे.बेला चे लेखी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी आशीष प्रकाश वाघ वय २७ वर्ष रा.नागभीड कुनघाडा चौक मोहाली जि.चंद्रपुर पो.स्टे. बेला येथे कलम ३७९ भादंवि सहकलम १८४ मोवाका भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा अजय चौधरी मो क्र. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

### —: अपघात :—

**पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत मोहदी धोत्रा रोड, नरखेड मार्गावर २६/०५/२०२१ चे ०७:०० वा. ते ०७:२० वा दरम्यान मुलचंद कोठीलाल युवनाती रा. गोंडी खापा नरखेड हा आपली ताब्यातील हीरो होन्डा स्पलेन्डर मोटार सायकल एम एच ४० एन १२५८ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने, रॉग साईडने चालवुन समोरुन येणारी बैलबंडीला धडक मारून स्वता:च मरणास कारणीभुत ठरला

सदर प्रकरणी फिर्यादी संजय कुंजीलाल आहाके वय ३२ वर्ष जात गोंड, रा. वार्ड क्र १७ आसरे लेआउट नरखेड चे तोंडी रिपोर्ट वरुन मृतक आरोपी मुलचंद कोठीलाल युवनाती रा. गोंडी खापा नरखेड

विरुध्द पो.स्टे. नरखेड येथे  २७९,३३७,३०४ (अ), भादवी सहकलम १८४ मोवाका भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास साफौ  परी पोउपनि दोनोडे पोस्टे नरखेड  मो. नं. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

## —: पळवुन नेणे  :—

**पो.स्टे. मौदा** :— पो.स्टे. मौदा येथे दिनांक २६/०५/२०२१ रोजी फिर्यादी ने येवून तोंडी तक्रार नोंदविली की, तिची अल्पवयीन १६ वर्षाची लहान मुलीला शिवनंदन भुसन रा. गुनथळा  झोपडपटी ता. कामठी मौदा याचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन शिवनंदन भुसन रा. गुनथळा  झोपडपटी ता. कामठी आरोपी  विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि नितीन आगासे पो. स्टे. मौदा मो. नं. ९१३०००१७१५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**